जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०९/१२/२०२३
## दि.०८/१२/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे १२३९/२०२३,भादविक ३९२,५०४,५०६,४२७,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३१ वर्षे,रा.गंवजे रोड,शिरगाव,ता.मावळ,जि.पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/१२/२०२३ रोजी रात्री २१/४५ वा.मोहन मार्बलचे लगतचे अंतर्गत रोडवर,पिसोळी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मोहन मार्बल,पिसोळी येथील अंतर्गत रोडवर त्यांचे टेम्पो मध्ये गुजरात मधुन भरलेला सेनेटरीचा माल उतरवण्यासाठी नमुद ठिकाणी थांबले असताना,यातील दोन अनोळखी इसमांनी आपसात संगनमत करून स्कूटीवरून येऊन,फिर्यादीस शिवीगाळ करुन त्यांचे टेम्पोचे दरवाजाची काच कशाचेतरी सहाय्याने फोडून नुकसान केले. तसेच फिर्यादीस धमकी देवुन,त्यांचेकडील ५००/- रुपये रोख रक्कम,एक मोबाईल,सोन्याचा बदाम,कानातील बाळी असा एकुण ९,५००/- रूपये किमतीचा ऐवज जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. पुजा पाटील ७७६७०५३९२७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ४९५/२०२३,भादविक १४३,१४७,१४९,१७०,३४१,३२३,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | अभिजीत शेलार,वय-२८ वर्षे,रा.बाणेर,पुणे |
| **आरोपीत** | कारवरील चालक व त्याचे इतर ०५ साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/१२/२०२३ रोजी २०/४० वा.मुंबई-बेंगलोर हायवेच्या सर्व्हिस लेनवर आर.एम.डी. कॉलेजचे समोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे कामानिमीत्त कर्वेनगर येथुन त्यांचे कारसह घरी जात असताना,नमुद ठिकाणी यातील नमुद कारवरील चालकाने फिर्यादी यांची कार पुढे नेण्याचे कारणावरुन तसेच तो पोलीस असल्याचे बतावणी करुन,त्याचे इतर पाच साथीदारांनी गैर-कायदयाची मंडळी जमवुन,फिर्यादीस शिवीगाळ व दमदाटी करुन,थांब तुझ्या डोक्यात दगड घालतो अशी धमकी देवुन,त्यांना लाथा-बुक्यांनी मारहाण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, वणवे ९९५२३६५८७४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ३३०/२०२३,भादविक ३२४,५०४,५०६,३४,आर्म ॲक्ट ४(२५),महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३)१३५, क्रिमिनल लॉ अमेडमेंट ॲक्ट कलम ७ प्रमाणे |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३६ वर्षे,रा.तळजाई वसाहत,पदमावती,पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/१२/२०२३ रोजी रात्रौ २२/०० वा.स.नं.६५,न्यु कोहीनुर बेकरीच्या काऊन्टंर समोर सार्वजनीक रोडचे कडेला तळजाई वसाहत पदमावती पुणे येथे |

**तपशिल** यातील फिर्यादी हे न्यु कोहीनुर बेकरीच्या काऊन्टर समोर थांबले असताना,यातील नमुद इसमांनी सदर ठिकाणी येवुन फिर्यादीस विनाकारण शिवीगाळ करून,आम्ही तळजाई मधील भाई आहोत,आम्ही आल्यावर तुमची दुकाने बंद झाली पाहीजेत,आम्हास कोणी नडला तर, त्याला सुट्टी देणार नाही असे म्हणुन सदर परिसरात दहशत निर्माण करून,त्याचे जवळील लोखंडी धारदार हत्याराने त्यांचे उजवे हाताचे मनगटावर वार करून त्यांना जखमी केले. तसेच सदर ठिकाणी जमलेल्या सर्व नागरीकांना शिवीगाळ करून,त्यांचेकडील लोखंडी धारदार हत्यार व लाकडी बांबु नागरीकांचे दिशेने उगारून,त्यांचेकडील दुचाकी गाडीवर बसुन आरडा-ओरडा करीत तेथुन तळजाई वसाहती मधील खंडाळे चौकाच्या दिशेने निघुन गेले आहेत.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. राहुल खंडाळे ९५५२६३५१५१

**४**

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोरेगांव पार्क पो स्टे १९३/२०२३,भादविक ३०६,३४

**फिर्यादी** एक ज्येष्ठ महिला,वय-७८ रा.विद्युतनगर सोसा.कोरेगाव पार्क,पुणे

**आरोपीत** दोन महिला व एच.आर.विभाग प्रमुख (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** माहे जानेवारी २०२३ ते ३१/१०/२०२३ रोजीचे कालावधीत नामांकीत हॉस्पीटल,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांची सुन मिताली आचार्य ही नामांकीत हॉस्पीटल मध्ये नोकरी करीत असताना,यातील नमुद हॉस्पीटल मधील दोन महिला यांनी आपसात संगनमत करून,किरकोळ कारणावरुन स्टाफ समोर तीस टोचुन बोलत असताना,सदरबाबत तीने व एच.आर.विभाग प्रमुख यांचेकडे तक्रार केली असता,त्यांनी तीस अपमानस्पद वागणुक देवुन,तीला राजीनामा देण्यास भाग पाडुन,त्यानंतर मिताली ही नोकरी साठी लेखी अर्ज घेवुन त्याचेकडे गेली असता आ.क्र.३ याने मी कोणाला पण नोकरी देईल,पण तुला नोकरी देणार नाही असे बोलुन,तीचा अर्ज तीचे अंगावर फेकुन तीस मानसिक त्रास दिल्याने त्यामुळे तीचेवर मानसिक दडपण येवुन,त्यांचे त्रासाला कंटाळुन,मिताली हिस तीचे राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले.

**त.अंमलदार** म.पो.उप.निरी. इंगोले ८२०८५६३८१४

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** समर्थ पो स्टे २६४/२०२३,भादविक ३५३,३३२,५०४

**फिर्यादी** प्रकाश शेंडेकर,वय ३९ वर्षे, चालक(एस.टी.महामंडळ) रा. वडदे गाव, ता मोहोळ, जि. सोलापुर

**आरोपीत** मोपेडवरील एक अनोळखी चालक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक ०७/१२/२०२३ रोजी १४/३० वा.केईएम हॉस्पीटल,समोरील सार्वजनिक रोडवर,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ येथे चालक पदावर नियुक्त असुन ते विठाई एस.टी.बस ही प्रवाशांना घेवुन पंढरपुर ते मुंबई सेंट्रल बस स्टॅण्ड असा बसचे वाहक रवीकांत शिंदे यांचेसह घेवुन जात असताना,नमुद ठिकाणी रस्त्यावर फिर्यादी यांचे बसचे वाहकाच्या बाजुकडील मागील बाजुच्या चाका जवळ आवाज आल्याने,फिर्यादी यांनी गाडी थांबवली असता,मोपेडवरील अनोळखी इसमाने फिर्यादी यांना तु मला कट मारला,म्हणुन मी गाडीवरुन पडलो असे म्हणुन फिर्यादी यांना अपशब्द वापरून,त्यांना धक्का-बुक्की करून दुखापत केली आहे. तसेच फिर्यादी हे करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा आणला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. कुटे ८३२९५०७५५३

**६**

**पो.स्टे.गुरनं./कलम** लोणी-काळभोर पो स्टे ७५०/२०२३,भादविक २७९,३३८,३०४(अ),४२७,मो.वा.का.कलम १८४, १३४(अ)(ब),११९/१७७

**फिर्यादी** सुनिल बंडगर,वय-३६ वर्षे,रा.साईराज पार्क,सिद्राम मळा,लोणी-काळभोर,पुणे

**आरोपीत** अज्ञात वाहनावरील अज्ञात चालक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०३/१२/२०२३ रोजी सकाळी १०/०० वा. पुणे-सोलापुर राष्ट्रीय महामार्गावर महिंद्र शो-रूम समोर कदमवाक वस्ती,ता.हवेली,जि.पुणे येथे

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मावस भाऊ सुरज रावसाहेब दुपारे,वय-४० वर्ष,रा.साईराज पार्क,सिद्राम मळा,लोणी-काळभोर,पुणे हा मोटार सायकलवरुन कदमवाक वस्ती येथे त्याचे राहते घरी जात असताना,यातील नमुद अज्ञात वाहन चालकाने,त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमां कडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार सुरज दुपारे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. (फिर्यादी यांनी आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. धायगुडे ८८८८८२००२१ |

**७**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३२८/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-६६ वर्षे,रा.गोंधळे गल्ली,कोल्हापुर |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०८/१२/२०२३ रोजी सकाळी ०५/४५ वा.पी.एम.पी.एम.एल.बस स्टॉप,निगडी,पुणे येथील बस मध्ये चढत असताना |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे पत्नीसह मनपा पीएमपीएमएल बसने प्रवास करण्यासाठी बस मध्ये चढत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे पॅन्टचे खिशातील पाकीटा मधील ३,७९०/- रुपये रोख रक्कम, बँकेचे ए.टी.एम कार्ड चोरी करून घेवुन जावुन,त्यानंतर एम.जी.रोड,पुणे येथील बँकेचे ए.टी.एम. सेंटर मधुन फिर्यादी यांचे एटीएम कार्ड मधुन एकुण ५०,०००/- रुपये रोख रक्कम काढुन घेतले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. प्रतापसिंह शेळके ९८५०४९४९८७ |

**८**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १८६१/२०२३,भादविक ४५२,५०४,५०६,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-२० वर्षे,रा.माळवाडी,हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०८/१२/२०२३ रोजी सकाळी ११/३० वा. अमरधाम स्मशान भुमी रोड,माळवाडी, हडपसर,पुणे येथील फिर्यादीचे राहते घरी तसेच घरा बाहेर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घरा मध्ये त्यांचे आई सोबत असताना,यातील नमुद इसमाने त्याचे हातामध्ये लोखंडी धारदार शस्त्र घेवून,बेकायदेशीररित्या फिर्यादी यांचे घरा मध्ये घुसुन, फिर्यादी यांनी त्याचेविरुध्द दोन दिवसांपुर्वी दिलेल्या तक्रारीचा राग मनात धरून,फिर्यादीस शिवीगाळ करुन,त्यांना जीवे मारण्याची धमकी देवुन,त्यांचे हाता मधील लोखंडी धारदार शस्त्रे हवेत फिरवुन,आरडा-ओरडा व शिवीगाळ करून,सदर परिसरातील नागरीकां मध्ये दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. सुवर्णा गोसावी ७२७६२९२१०६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**